अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

दगडफेक करून दहशत पसरवणाऱ्या सहाजणांना न्यायालयीन कोठडी

✔ सुराज्य/सोलापूर

सिव्हिल येथील पोटफाडी चौकात मागील भांडणाच्या कारणावरून बेकायदेशीर जमाव जमवून दगडफेक करून वाहनांची तोडफोड केल्याबद्दल १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस कर्मचारी सर्फराज जिलानी मुजावर यांच्या फिर्यादीवरून आकाश अनिल मुदगल,आकाश मधुकर माने, गणेश मधुकर माने,नितीन मधुकर माने,विजय वेंकप्पा म्हेत्रे, अजय नामदेव शिंदे आणि दुसऱ्या गटातील नागनाथ उर्फ नागेश बाबू कांबळे, करण कुंडलिक काळे,राहुल खाजाप्पा रेड्डी, सम्राट श्रीमंत कांबळे, पिंटू एकमल्ले, शितल नंदकुमार बनसोडे, मोहसीन शेख, सचिन कुंडलिक काळे व अभि दिगंबर कांबळे अशा १५ जणांविरुद्ध सोमवारी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यापैकी सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.दोन्ही गटातील सहा जणांना न्यायालयात उभे केले असता त्यांना न्यायालयीन कोठडीत देण्यात आली आहे. तसेच एका जनास त्रास होत असल्याने त्याला सिव्हील हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आल्याचे फौजदार सचिन माळी यांनी सांगितले.

रविवारी रात्री अकराच्या सुमारास दोन्ही गटातील कार्यकर्ते पोटफाडी चौकात समोरासमोर आले.त्यावेळी त्यांनी मागील भांडणाच्या कारणावरून एकमेकांच्या दिशेने दगडफेक करून रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तींना तसेच वाहनधारकांना काट्या व धारदार हत्यारे दाखवून त्यांची वाहने थांबून त्यांना पुढे जाण्यास मनाई करुन लोकांमध्ये दहशत पसरवली.

www.surajyadigital.com | बुधवार, दि.८ फेब्रुवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १३३ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

थोरातांचा नाराजीनामा

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राज्य विधिमंडळातील काँग्रेसचे पक्षनेते बाळासाहेब थोरात ॲडमिट असताना राज्यात झालेली विधानपरिषदेची निवडणूक, या निवडणुकीतून त्यांचे मेहुणे डॉ. सुधीर तांबे यांनी उमेदवारी मिळालेली असतानाही ऐनवेळी घेतलेली माघार, भाचे सत्यजित तांबे यांनी दाखल केलेला अपक्ष उमेदवारी अर्ज, या प्रक्रियेत झालेले राजकारण, तांबेंचा झालेला दणदणीत विजय, निवडणुकीनंतर तांबेंनी केलेला भांडाफोड, तत्पूर्वीच तांबे पिता-पुत्रांवर काँग्रेसने केलेली कारवाई या पार्श्वभूमीवर प्रचंड व्यथित झालेल्या थोरातांनी आधी पक्षाकडे लेखी पत्राद्वारे नाराजी व्यक्त केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पक्षश्रेष्ठीकडे विधिमंडळातील पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या या नाराजीनाम्यामुळे राज्याच्या राजकारणात प्रचंड खळबळ निर्माण झाली असून आता हे राजकारण आता कोणत्या पायरीला जाऊन पोहचते; याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मंगळवारी बाळासाहेब थोरात यांचा वाढदिवस होता. त्यांचे कार्यकर्ते आणि समर्थक वाढदिवस साजरा करण्यात मग्न असताना त्यांच्याच राजीनाम्याची बातमी आली आणि काँग्रेसमध्ये सन्नाटा निर्माण झाला. त्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात तक्रारींचा पाढा सुरू झाला. थोरातांचा राजीनामा प्रदेश काँग्रेसपर्यंत पोहचलाच नाही असे सांगणारे प्रदेशाध्यक्ष पटोले हे दुपारी 'काही चुका झाल्या, पण लक्षात येताच त्या तात्काळ दुरुस्तही केल्या', अशी कबुली देतानाच 'त्यावरून थोरातांनी राजीनामा देण्याची आवश्यकता नव्हती' असे स्पष्टीकरण देताना दिसले.

प्रभारींनी बोलावली बैठक

दरम्यान, या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रभारी एच.के. पाटील यांनी मंगळवारी तात्काळ दिल्ली गाठली असून दि. १० फेब्रुवारी रोजी काँग्रेसचे आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये समन्वय साधण्यात पक्षनेतृत्वाला यश येते की नाही? याकडेच महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. तत्पूर्वीच काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी प्रदेशाध्यक्षांविरोधात तोंड उघडण्यास सुरुवात केली आहे.

अजितदादांनी उघड केला थोरातांचा राजीनामा

राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मंगळवारी सकाळी थोरातांना फोन केला. त्यावेळी थोरातांनी विधिमंडळ पक्षनेतेपदाचा राजीनामा दिल्याबाबत सांगितल्याचे अजितदादांनी पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. त्यानंतर थोरातांच्या राजीनाम्याची बातमी अधिकृतपणे बाहेर आली. पुढे दिवसभर राज्यामध्ये थोरातांच्या राजीनाम्याचीच चर्चा ऐकायला मिळाली.

काळजी करण्याचे कारण नाही : शिंदे



'थोरात यांनी दिल्लीला पाठवलेले साधे पत्र आहे की राजीनामा आहे, हे अद्याप माहिती नाही. पटोले यांनादेखील याबाबत माहिती नाही. त्यांचे कोणाशी बोलणे झालेले नाही. मी काल प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंसोबत पुण्यात होतो. पटोले यांनादेखील याबाबत माहिती नाही', असे सांगतानाच 'हे सर्व वाद तात्पुरते असतात. सगळं काही ठीक होईल. काळजी करण्याचे कारण नाही', असा विश्वासही माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केला.

भाजपमध्ये येणाऱ्यांचे स्वागतच : बावनकुळे

'थोरात किंवा अन्य कुणीही भाजपात प्रवेश करण्यास इच्छुक असतील तर त्यांचा मान सन्मान ठेवून आम्ही त्यांना प्रवेश देत असतो' अशा शब्दात थोरातांना भाजपचे आमंत्रण देतानाच 'थोरात यांच्या रक्तात काँग्रेस आहे. काँग्रेस वाढविण्यासाठी त्यांनी खूप मोठे काम केले आहे. प्रदेशाध्यक्ष असताना काँग्रेसला त्यांनी सावरले होते. त्यामुळे ते भाजपात प्रवेश करतील, असे मला वाटत नाही', अशी स्पष्टोक्तीही भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नववीत शिकणाऱ्या मुलीचा विनयभंग, शिक्षकावर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

मोहोळ तालुक्यातील एका माध्यमिक शाळेत नववीत शिकणाऱ्या मुलीचा हात पकडून तू माझ्यासाठी खास आहेस असे म्हणत दोन अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याप्रकरणी त्या शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मोहोळ तालुक्यातील एका नामांकित खाजगी शाळेत नववीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलींचा सहा जानेवारी रोजी मराठीचा पेपर सुरू असताना पीडित फिर्यादी मुलीच्या बेंच जवळ जाऊन तिचा हात पकडून तिच्या हातातील यड्याळात वेळ बघण्याचा बहाणा करून तिच्याजवळ थांबून वारंवार तिचा हातात हात येऊन स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर संबंधित मुलीने विचारणा केली असता त्या शिक्षकाने गप्प बस नाहीतर तुझे मार्क कमी करेन अशी धमकी दिली.

पेपर संपवून पीडित मुलगी मैत्रिणी सोबत घरी जात असताना त्या शिक्षकाने संबंधित दोन्ही मुलींकडे वाईट नजरेने बघितले. दरम्यान फिर्यादी पीडित मुलीची मैत्रीण सायंकाळी आठ वाजता तिच्या घरी गेली .व सांगू लागली की आज दुपारी पेपर सुरू असताना सर नेहमी माझ्या बेंचवर येऊन बसत होते. त्यावेळी मी त्यांना माझ्या बेंचवर बसू नका असे सांगून देखील ते बेंचवर बसून माझा मोबाईल नंबर मागत होते .मी त्यावेळी माझ्याकडे मोबाईल नाही माझ्या वडिलांकडे असतो असे सांगितले त्यानंतरही त्यांनी हात धरून हातात हात येऊन तू माझ्यासाठी खास आहेस असे म्हणत एका पेपरवर त्यांचा स्नॅपचॅट या ॲप्लिकेशनचा आय डी लिहून दिला. व त्यावरती मेसेज करण्यासाठी सांगितले मी मोबाईल वापरत नाही असे सांगितल्यानंतरही त्यांनी व्हाट्सॲप किंवा स्नॅपचॅटवर मेसेज कर असे सांगून निघून गेले. मी शाळेतून घरी गेल्यानंतर अभ्यासासाठी माझ्या वडिलांचा मोबाईल घेऊन बसले असताना शाळेतील सरांनी हाय म्हणून मेसेज केला. त्यावेळी मी त्यांना बोला की सर असा मेसेज केला असता सरानी स्नॅपचॅट वर मेसेज करण्यास सुरुवात केली व बोलू लागले. त्यावेळी त्यांनी मला तू माझ्यासाठी खास आहे असा मेसेज केला होता. शेवटी घाबरलेल्या दोन्ही मुलींनी ही घटना पालकांना सांगितली. त्यानुसार पिडीत मुलीने दिलेल्या फिर्यादी नुसार शिक्षक सिध्देश्वर बजरंग वागज याचे वरती विनयभंगाचा गुन्हा सात फेब्रुवारी रोजी दाखल करण्यात आला असून याबाबत चा तपास पोलीस करत आहेत.

जळोली येथे बांधाच्या वादातून कोयत्याने हल्ला

✔ सुराज्य/सोलापूर

शेतातील बांधाच्या वादातून पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरून कोयता, काठी आणि लोखंडी गजाने केलेल्या मारहाणीत एकाच कुटुंबातील तिघेजण जखमी झाले. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. ही घटना जळोली (ता. पंढरपूर) येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

किसन भानुदास नरसाळे (वय ५०) त्यांची पत्नी उल्का नरसाळे (वय ४५) आणि मुलगा अमर किसन नरसाळे (वय २२ सर्व रा. जळोली) अशी जखमींची नावे आहेत. सर्व जखमींना करकंब येथे प्राथमिक उपचार करून त्यापैकी दोघांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात तर किसन नरसाळे यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी किसन नरसाळे यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना विलास मदने त्याचा मुलगा गणेश मदने याच्यासह ९ जणांनी मारहाण केली.

शेतातील बांधावरून झालेल्या भांडणाच्या कारणावरून किसन नरसाळे यांनी विलास मदने याच्याविरुद्ध करकंब पोलिसात तक्रार दिली होती.

त्याचा राग धरून सोमवारी सायंकाळच्या सुमारास मदने गटातील आरोपी नरसाळे यांच्या शेतातील घरात घुसून त्यांना मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे. दुसऱ्या गटातील गणेश विलास मदने (वय २३ रा.जळोली हा देखील मारहाणीत जखमी झाला. त्याला देखील सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. किसन नरसाळे अमर नरसाळे आणि इतर तीन जणांनी त्याला गळा दाबून मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

वेळापूर-धानोरे रोडवर मोटरसायकलींची धडक, एक ठार; दोघे जखमी

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर (ता.माळशिरस) येथील वेळापूर-धानोरे तांदुळवाडी रोडवर चव्हाणवाडी जवळ महादेव लोंढे यांच्या शेताजवळ दोन मोटर सायकलची धडक होऊन यामध्ये हणमंत भानुदास हगवने (रा. खळवे) हा जागीच मयत झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.४५ च्या सुमारास वेळापूर येथील रोहित विजय माने हा एपी ०९ बी एल ४०३३ मोटार सायकलवरून डेअरीला दूध घालून धानोरे कडे घरी जात होता तो मोहन लोंढे यांच्या केळीच्या बागेजवळ आला असता केळीच्या बागेमधून केळीतील रोडवरुन औषध मारण्याचे पंप साहित्य घेऊन मोटार सायकल नंबर एम एच १३ ए बी ८७६२ वरून हणमंत भानुदास हगवणे व सुधीर गणपत चव्हाण दोघे राहणार खळवे हे केळी बागेतून रोडवर येताना दोन्ही मोटरसायकलची जोरदार धडकून होऊन यामध्ये खळवे येथील हनुमंत भानुदास हगवणे हा जागीच मयत झाला तर सुधीर गणपत चव्हाण राहणार खळवे व रोहित विजय माने राहणार वेळापूर हे जखमी झाले.

घटनेची माहिती कळताच वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव व पोलीस कर्मचारी हजर होऊन जखमींना त्वरित दवाखान्यात हलवण्यासाठी सहकार्य केले. दरम्यान आज रोजी वेळापूर धानोरे रोडवर जो अपघात झाला त्यामध्ये वेळापूर येथील अविराज मुंगुस्कर याने जखमींना तातडीने उपचारासाठी मदत केल्याबद्दल त्याचा वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या हस्ते वेळापुर पोलीस स्टेशन येथे सत्कार करण्यात आला.

वेळापूर आरोग्य केंद्रात दोन ॲम्बुलन्स उभ्या असतानाही जखमींना मदत नाही

वेळापूर येथे अपघात घडला असता जखमींना औषध उपचार साठी तातडीने पाठवण्यासाठी १०८ वरून फोन करून मदतीची मागणी केली असता व वेळापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन ॲम्बुलन्स उभ्या असतानाही फोनवरून मदत मागितली असता चालक उपलब्ध नसल्याचे कारण सांगण्यात आले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

वाट लागली !!!

कल्याण
199-95-168

मेन बाजार
270-92-237

परिणाम भोगावे लागतील

संभाजीराजेंनी जितेंद्र आव्हाडांना सुनावले

✔ सुराज्य/मुंबई

राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी केलेल्या वादग्रस्त विधानांबाबत माजी खासदार छ.संभाजीराजे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. आव्हाड यांच्या त्या वक्तव्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील,असा इषारा संभाजीराजेंनी दिला आहे.

आव्हाड यांनी छत्रपती शिवरायांबाबत केलेल्या वक्तव्यावरून संभाजीराजे यांनी निशाणा साधला आहे. चर्चेत राहण्यासाठी बेताल वक्तव्य करणे बरे नव्हे. याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा संभाजीराजेंनी आव्हाडांना ट्वीटमधून दिला आहे. आव्हाडांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावरुन संभाजीराजे आक्रमक झाले आहेत. यासंदर्भात त्यांनी ट्वीट करुन आव्हाडांना खडे बोल सुनावले आहेत. आव्हाड हे एका विशिष्ट कंपूत वाढलेले आहेत. महाराष्ट्र त्यांना गांभीर्याने घेत नाही आणि घेणारही नाही.

काय म्हणाले होते आव्हाड?

हे सगळे समजायला अक्कल लागते... औरंगजेब अफजल खान हे इतिहासातून काढून टाकले तर मग शिवाजी महाराजांची लढाई कुणाबरोबर झाली. त्यांचे शौर्य चलाखी युद्ध नीति कशी समजावणार... जाऊदे तुमचा दोष नाही. हे सगळे समजणे म्हणजे मुंबईचा गँगवॉर नाही... झाकली मूठ सव्वालाखाची., असे ट्वीट जितेंद्र आव्हाड यांनी केले होते. या ट्वीटनंतर सत्ताधाऱ्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उडवली आहे. सोशल मीडियावरही दोन गट तयार झाले आहेत. आव्हाड हे शिवरायांबाबत केलेल्या वक्तव्यावर ठाम आहेत. याबाबतच आणखी एक ट्वीट त्यांनी केले आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शिवरायांबाबत केलेल्या वक्तव्याचा दाखला देत आव्हाडांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. रामदास स्वामी नसते, तर शिवाजी महाराज कुठे असते...? हे कोण बोलले आणि यावर कोण कोण तुटून पडले, असा सवाल त्यांनी विरोधकांना केला आहे.हे वक्तव्य उद्दामपणे करून आव्हाड यांनी आगीत तेल ओतले आहे. आव्हाड यांनी केलेल्या वक्तव्याचा सर्वत्र निषेध व्यक्त केला जात आहे.भाजपने त्यांच्याविरूद्ध आंदोलन सुरू केले आहे.असे असताना संभाजीराजेंनी हा खणखणीत इषारा दिल्यामुळे राष्ट्रवादीच्या श्रेष्ठींना आव्हाडांच्या बाबतीत विचार करावा लागेल,असा सूर सर्वत्र उमटत आहे.

'लोकल बॉडी'च्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

✔ नवी दिल्ली : राज्यातील लोकल बॉडी अर्थात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात मंगळवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे गेल्या आहेत. निर्णय कोर्टात प्रलंबित असल्याने काही महापालिकेच्या व जिल्हा परिषदांच्या निवडणुका तीन वर्षे होऊ शकल्या नाहीत.

सोलापूर मनपा आणि झेडपीची निवडणूक नऊ महिन्यांपासून प्रलंबित आहे.या प्रकरणी न्यायालयात सुनावणी होणार होती. मात्र, वेळ संपल्याने या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे आता पुढच्या सुनावणीकडे राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे. या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी होणार होती. चौथ्या क्रमांकावर हे प्रकरण होते. परंतु, दहा मिनिटे आधी तिसऱ्या क्रमांकाचे प्रकरण संपले आणि कोर्टाने कामकाजच थांबवले. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. पी.एस. नरसिंहा आणि न्या. जे.बी. पारडीवाला यांच्या त्रिसदस्यीय पीठापुढे याचिकांवर सुनावणी होणार होती. मात्र, आजचेही कामकाज रखडल्याने सुनावणी होऊ शकली नाही. कोरोनामुळे वर्षभर लांबणीवर पडलेल्या निवडणुका आता सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीमुळे रखडल्या आहेत. मात्र, आज याबाबतचा मुद्दाच चर्चेला घेण्यात आला नाही. त्यामुळे या निवडणुका आता पुन्हा लांबणीवर पडल्या.